स्थायी समितीच्या **गुरुवार दिनांक 19—07—2018** रोजी **दुपारी 12—00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 10. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 11. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 13. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 14. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 15. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

**1.** श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त (1)
**2.** श्री. अजिज शेख, अति. आयुक्त (2)
**3.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 171ः—**
**{लोककर्म झोन 6}**
प्रभाग क्र. १९ ड अंतर्गत रिसालदार रोड ते आदर्श शाळेपर्यंत नाल्याचे बांधकामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. जितू कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा १७.०० प्रतिशतने कमी दरांची रू.५१,८३,२०७/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 172ः—**
**{स्लम विभाग}**
प्रभाग क्र. 35 (क) अंतर्गत जोगीनगर भिमनगर मध्ये सिमेंट रोड, फुटपाथ व स्ट्रॉम ड्रेन लाईनचे कामास्तव प्राप्त एकुण 06 निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. आर.एम. दयारामानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 18.00% टक्के कमीवर असलेली रूपये 92,88,399/— (रूपये ब्यान्नव लक्ष, अठ्ठयांशी हजार तिनशे नव्यान्नव फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 173</u>ः— हद्दवाढ झालेल्या क्षेत्रात सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियाना
{लोककर्म झोन 03} अंतर्गत मंजूर अनुदानातून नागपूर महानगरपालिके व्दारा शासनास सादर करण्यात आलेला नरसाळा या भागातील सुर्योदय नगर येथे खडीकरणाचे कामास्तव रू. ३७,४६,५०१/— रूपयाचे प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी नागपूर यांची दिनांक १४.०५.२०१८ ला मंजूरी प्राप्त असून ५० टक्के हिस्स्याची रक्कम रू. १८,७३,२५०/— नगरोत्थान डी.पी.डी.सी. अंतर्गत प्राप्त झाले असून महानगरपालिकेच्या ५० टक्के हिस्स्याची रक्कम रू. १८,७३,२५०/— भरण्यास मनपाची सहमती असल्याचा ठराव मंजुर करणे या अटीच्या अधीन राहुन मंजुरी दिलेली आहे. करीता शासनाचे अटीनुसार म.न.पा चा हिस्सा ५० टक्के प्रमाणे उपरोक्त नमूद विकास कामास्तव रू. १८,७३,२५०/— रक्कमेचा सहभाग देण्याचा व खर्च पद क्र. A42001360905 अंतर्गत सन २०१८—२०१९ चे तरतुदी मधुन करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

तसेच स्थायी समिती चे मान्यतेनंतर प्रस्ताव महासभे पुढे सादर करण्यात येईल, यास स्थायी समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली

<u>ठराव क्रमांक 174</u>ः— प्रभाग क्र. 2 अंतर्गत कामगारनगर चौक रिंग रोड येथील
{लोककर्म झोन 9} नाल्यावरील पडलेल्या पुलाचे बांधकाम करण्यास्तव रु. 28,95,812/— रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करून हे काम तातडीचे असल्याने लंघु निविदा मागवून करून घेण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

हे काम पद क्र. A28801332203 अंतर्गत करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 175</u>ः— म.न.पा. स्थायी समिती ठराव क्र. 08, दि. 09/03/2018 नुसार,
{सा.प्र.वि} म.न.पा. स्थायी समिती ठराव क्र. 215, दि. 10/06/2016 नुसार सी.सी.रोड फेज—II अंतर्गत नागपूर शहरातील रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे कामावर देखरेख ठेवण्याकरिता कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेले सेवानिवृत्त उप अभियंते श्री. सुशील नानीकराम टहीलरामानी यांना कार्यालयीन आदेश क्र.103/ओ.ॲन्ड एम. दि. 21/03/2018 नुसार दि. 08/03/2018 पासून पुढील 3 महिन्याकरिता मुदतवाढ देण्यात आली. या आदेशान्वये त्यांची मुदतवाढ दि. 07/06/2018 रोजी संपुष्टात आल्यामुळे व त्यांची आवश्यकता असल्यामुळे, 2 दिवसाचा तांत्रीक खंड देवून, दि. 12/06/2018 पासून पुढील 3 महिन्याकरिता मुदतवाढ देण्याचा व याकरिता रू. 1,20,000/— इतका खर्च येण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 176</u>ः— नागपूर शहरा अंतर्गत विविध दहन घाटावर शवदहनासाठी
{आरोग्य विभाग} शेणाच्या गोवऱ्या पुरविण्याकरीता प्रति शव दहन (मनुष्यबळ, वजन काटयासह, शरण रचुन देण्यासह) पुढील दोन वर्षाकरिता निविदा मागविण्यास्तव आणि दिनांक ०५/१०/२०१६ पासुन दि. ३१/०५/२०१८ या कालावधीत पुरविण्यात आलेल्या गोवऱ्या बाबत चे देयकाच्या कार्योत्तर मंजुरीस्तव स्थायी समितीद्वारे पारित करण्यात आलेला ठराव क्र. १२४ दि. ०५/०६/२०१८ खालीलप्रमाणे आहे.

नागपूर शहराअंतर्गत विविध दहन घाटावर शवदहनासाठी मोफत शेणाच्या गोव—या मनपातर्फे पुरविण्यात येतात. सन 2015—16 व 2016—17 या दोन वर्षाकरीता निविदेद्वारे गोव—या खरेदीचे कंत्राट रु. 5700/— प्रति टन या दराने केवळ गोव—या पुरविण्याचे काम

में. अवस्थी ट्रेडर्स यांना देण्यात आले होते. निविदेची मुदत दि. 29/09/2016 रोजी संपुष्ठात आली आहे. हे कार्य करणे अत्यंत आवश्यक होते म्हणून संबंधीत कंत्राटदाराकडून जुन्याच दरावर गोव—या पूरवठा सुरु ठेवण्यात आला आहे.

1) दिनांक 05/10/2016 पासून दि. 30/04/2018 पावेतो कंत्राटदाराने दहनघाटावर पुरविलेल्या गोव—यांचे देयक सादर केले आहे. देयकाची रक्कम रु. 19,81,623/— असून या देयकाच्या आधारे प्रतिमाह सरासरी रु. 1,04,296/— खर्चाची गणना करुन मे महिन्या सह एकुण रु. 20,85,919/— एवढा खर्च अपेक्षित आहे.या खर्चास कार्योत्तर मंजुरी आवश्यक आहे.

2) सदर कामाकरीता जुन 2018 पासून पुढील दोन वर्षाकरीता म्हणजेच माहे में—2020 पावेतो निविदा काढण्याच्या खालील प्रमाणे प्रस्ताव सादर आहे.

जुन्या कंत्राटदाराच्या केवळ गोव—या पुरविण्याकरीता रु. 5700/— प्रति टन प्रमाणे पुरवठा करण्याचे कार्य सुरु असून पुरवठा व Consumption यात अनेक वेळा तुट आढळून आली ती टाळण्याकरीता यानंतर निविदा नविन काढतांना कंत्राटदारानेच त्यांची माणसे स्मशान भुमीवर नेमणे, वजन काटे पुरविणे, गोव—याचे वजन करुन ती रचून देणे यासाठी प्रति शव दर मागविणे अश्या स्वरुपाच्या निविदा मागविण्याचे प्रस्तावित आहे.त्यामध्ये खालिल कामाचा समावेश करण्यात येईल.

**विवरण**

1) शहरातील मनपाच्या सर्व दहनघाटावर प्रति शव दहनाकरीता 10 किलो याप्रमाणे गोव—या पुरविणे.
2) वजन काटे पुरविणे.
3) गोव—याचे वजन करणे, गोव—या दहनाच्या ठिकाणा पर्यंत पोहचवून, गोव—या रचून देणे.

नागपूर शहरात मनपाचे सर्व दहन घाटावर सन 2017—18 मध्ये एकुण 13,451 शवाचे दहन करण्यात आले आहे. यावर्षी अंदाजे 14500 शवदहनाकरीता दोन वर्षाकरीता दरकरार निश्चित करुन प्रतिशव दर निविदा मागविण्यात येतील निविदेमधील प्राप्त निम्मत्तम दरावर इतर एंजन्सी काम करण्यास तयार असल्यास त्यांना देखील हे काम विभागून देता येवू शकेल. यावर होणारा खर्च आय—व्यय पद क्रं. A23501141211 मधुन भागविण्यात येईल. करीता दि. 05/10/2016 ते मे 2016 या कालावधीत शहरातील दहनघाटावर पूरविण्यात आलेल्या गोव—यावर येणारा खर्च रु. 20,85,919/— यास कार्योत्तर मंजूरी देण्याचा तसेच या कामाकरीता जून 2018 पासून निविदेद्वारे प्रति शव दर मागविण्याचा प्रश्न विचारात घेऊन कब्रस्थानावर सुध्दा आवश्यक त्या सामुग्री मोफत देण्यात याव्या याच्या स्वतंत्र प्रस्ताव स्थायी समितीला सादर करावा. तसेच नारी घाट येथे मोफत शेणाच्या गोव—यांच्या पुरवठा करण्यात यावा. या सुचनेसह समितीने विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

उक्त ठरावामध्ये दि. 05/10/2016 ते मे 2016 या कालावधीत शहरातील दहनघाटावर पूरविण्यात आलेल्या गोव—यावर येणारा खर्च रु **20,85,919**/—यास कार्योत्तर मंजुरी देण्याचे नमुद आहे.परंतु वास्तविक हा कालावधी दि. 05/10/2016 ते 31/05/2018 असा आहे अनावधानाने संगणकात त्याची नोंद दि. 05/10/2016 ते मे 2016 घेण्यात आली आहे.

करीता मुळ **ठराव १२४ दि. ०५/०६/२०१८** यामधील दिनांक **(05/10/2016 ते 31/05/2018)** दुरुस्ती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 177:—** नागपूर महानगरपालिका मुख्यालयातील नविन प्रशासकीय
**{विद्युत विभाग}** इमारतीमधील सातव्या माळयावरील स्मार्ट सिटी व सस्टेनेबल डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशन लि. नागपूर कार्यालयामध्ये वातानुकूलित करावयाच्या प्रस्तावित कामाच्या

रू. 38,14,700 ⁄ — च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 178:— {लोककर्म झोन 2} कारपोरेशन कॉलोंनी येथील इंदिरा गांधी रुग्णालयाच्या दुरुस्तीच्या कामाकरिता एकूण 5 निविदाकारापैकी निम्नतम निविदाकार मे. सुविचार कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय राशी पेक्षा 15 टक्के कमी दराची रु. 39,36,761 ⁄ — किंमतीची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 179:— {कार्य अभि प्रकल्प} नागपूर महानगरपालिका, नागपूर येथील नविन प्रशासकिय इमारतीतील 7 व्या मजल्यावरील स्मार्ट सिटी कार्यालयाकरीता Modular Furniture खरेदी करण्याकरीता रूपये 92,74,160 ⁄ — चे प्राकलन म.न.पा. चे नोदंणीकृत आर्किटेक्ट, मे. वि. के. असोसिएट्स, यांनी तयार करण्यात आले असुन यास तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.

आर्किटेक्ट, मे. वि. के. असोसिएट्स, यांचे आर्किटेक्ट शुल्क 3 टक्के व जी.एस.टी. 18 टक्के समाविष्ट करून एकुण रूपये 1,12,71,814 ⁄ — च्या राशीस वर्ष 2018—19 म.न.पा. च्या अंदाजपत्रकातील पद क्र. A 40200440702 शिर्ष "स्मार्ट सिटी योजने अंतर्गत विविध प्रकल्प ⁄ विकास कामाकरीता मनपाचा सहभाग" अंतर्गत प्रस्तावित असुन यास प्रशासकीय मान्यता देण्याचा तसेच रितसर निविदा काढण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मे. वि.के. असोसिएटस यांचे 3% दर या स्थायी समितीस अधिक वाटतात त्यांचेशी दर कमी करण्यासाठी मुख्य अभियंता यांनी चर्चा करावी व स्वतंत्र प्रस्ताव मंजुरीकरिता स्थायी समिती समोर पाठवावा, या सुचनेसह विषयास एकमताने मंजुरी प्रदान केली.

सभापती :— आज ट्रेनिंग चालु है आप सब लोगों की,

श्री सांगोळे :— मुझे रस्ते के बारे मे ओ.सी.डबलु के बारे में बोलना था । पुरा खोदकर रख दिया है 8 ही दीन हो गये रोड बनाकर । त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली कमीश्नर साहेबांनी लिहीला होता पुट अप म्हणुन. ती फाईल मंजूर केली आपण आठच दिवस झाले होते रोड बनवाले. सहयोगनगर, कामगारनगर, कपीलनगर, अंगुलीमालनगर काय त्यांची दुर्दशा करुन टाकली. करोडो रुपयाचे रोड बनवून ठेवले आपण.

सभापती :— ये चारों जो साईट बता रहे मा. सदस्य वो आप देख तो लो आप लोग वहॉ व्हिजीट करो क्या हुआ है देखिये ताबडतोब विषय को समाप्त कीजिये ।

श्री भुट्‌टो:— चेअरमनसाहाब हमारे प्रभाग में 100 साल पुरानी लाईन को ब्रेक किया उसके बादमें 25 हजार लोगों को पाणी नही मिला । अभी भी 7 हजार से लेकर 10 हजार तक लोगों को अभी पाणी नही मिल रहा है । नागपूर महानगरपालिका का एक अधिकारी कर्मचारी काम कर रहा वहा पर इंजिनीअर है नायक करके कोई भी उसका सबस्टीट्‌युट नही है । उसको कोई मदत करने वाला नही है । इतने बडे पैमाने पर लोग उसको घेर रहे है । ओ.सी.डबलु के लोगों को घेर रहे है और मारने की तयारी में है ।, और वहॉ कोई काम नही कर रहा । हमारे घरपर भी पाच पाच सौ लोगो का मजमा लगा उसकी व्हीडीओ शुटींग है । पुलीस केस हो गया उसमे और महानगरपालिका के सभा मे मैने कहा था की ऐसी बात आयेगी तो वो अपने हाथ उपर कर देगें । आज ऐसी स्थिती में ओ.सी.डबलु के जो निचे के अधिकारी है । बडा कोई अधिकारी दिखता नही । मैं बहोत प्राब्लेम मे हु हमारे चारों नगरसेवक बहोत प्राब्लेम में है । इस समस्या पर उचित कार्यवाही के आप यह आदेश दे नही तो कोई बुरी घटना होने को समय नही लगेगा मैं यहॉ पर आपको सुचना दे रहा हूँ ।

मा. सभापती :— मा. सदस्यजी आप एक बात कीजिये जो भी आपको कहना है यहॉ वॉटर वर्क्स के कोई अधिकारी आये नही है । ये एनईएसएल का मुद्‌दा है। जो भी आपको कहना है सुचनाए देनी है वह पुरी तरह लिखकर एनईएसएल को दीजिये मैं भी उसमें सदस्य हूँ ।उसमें अच्छी तरह से चर्चा कर पायेगे। एक और काम करते है अभी हम वहॉ व्हीजीट करते है । अभी अधिवेशन है । इसलिये मिटींग नही हो पायेगी ।

श्री भुट्‌टो :— व्हीजीट करोगें वहॉ पर तो घेराव हो जायेगा । और समस्या हो जायेगी ।

सभापती :–जब वहॉ हम लोग नही जा सकते को कर्मचारी कैसे काम करेगे । यह मुद्दा एनईएसएल मे आना चाहिये । उसको हम लोग आगे बढायेगे । दुसरा आय.टी पार्क मे सिमेंट रोड का क्या हुआ ?

श्री जांभुळकर :– उसकों फिडींग किया है । वहॉ केन लगाई है ।वहॉ नालों का पाणी ड्रेन मे

मा.सभापती :– कब तक कंम्प्लीट करोगे तारीख बताईये । सिमेंट रोड का काम पहले सुरु होना चाहिये । वहॉ की समस्या कैसे सॉव्ह होगी, कितने दिन मे सॉल्व्ह होगी। कल ही इसपर अपनी बात हूई थी । कल इसपर आपकी विभाग से चर्चा नही हुई क्या? उसके उपर कैसे उपाय निकाले करके । अभी बरसात को देखते पहले गड्ढे भर दो ।

श्री जांभुळकर :– एमएसईबी को पहले लाईन के काम के बाद काम होगा । उस काम को 15 दिन लगेगे।

मा. सभापती :– यह 15 दिन का बारचार्ट बनाईये । बारचार्ट बनाकर मेरे ऑफिस में दे दीजिये।

श्री जांभुळकर :– कॉन्ट्रक्टर को अभी तक पैसा नही मिला. है उसको लेटर दिया है । मनपा के जितने कॉन्ट्रक्टर है उनको जानकारी दे दी है ।

मा. सभापती :– अगर काम नही हुआ तो हमकों उनपर ॲक्शन लेना पडेगा ।

श्री सांगोळे :– पैसा नही मिला करके काम नही करेगा तो उसने काम क्यों लिया । मा. मुख्यमंत्रीजी के क्षेत्र का काम है ।

श्री जांभुळकर :– आपल्या कंडीशन मध्ये आहे प्रत्येक महिन्यात त्याला पेमेंट करावयाचे आहे.

मा. सभापती :– 15 दिन में लाईन अप करके काम कर दीजिये । बिल्टींग आय ब्लॉक लगा दो ।

श्री कुकरेजा :– नही होगा बहोत गिला है आय ब्लॉक दब जायेगा ं।

मा. सभापती :– कितना दबेगा ।

श्री कुकरेजा :– वहॉ काम करने में बहोत अडचन है । उसमे सेटंर से पाईप लाईन लेकर जा रहे है । बिटींग करने के लिये 7 मिटर चौडाई से पाईप लाईन 1.2 मिटर जा रही है । बाकी सिमेंट रोड कर सकते है ।

मा. सभापती :– इस संदर्भ में मा. गडकरी साहाब का मॅसेज था । वहॉ बारीश तक नही रुक सकते । वह काम होना चाहिये । धरमपेठ के रोड पर टर्नीग पर कनेक्टीविटी नही है। रोड बंद कर दिया है । रोड खोदकर बढना चाहिये । वहॉ डिसीपी ट्राफिक ने रोका है ।

श्री हिरणवार :– वहॉ लोगों के रोडपर झगडे हो रहे है । मनपा डिसीजन नही ले सकती इसमें। हमारे प्रभाग के रोड शंकरनगर बहोत समस्या है । बंद करके रखा है उससे तकलीफ हो रही है । मा. सभापती :– एक रोड पर जाने के लिये घुमकर जाना पडता है । अभी काम नही होगा तो उसे खुलवॉ दीजिये । काम के समय बंद कर देगे । वहॉ की समस्या का निपटारा कीजिये ।

<u>ठराव क्रमांक 180</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर

सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर